महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्र.माशाअ २००९/(२५१/०९)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक ११ जून २००९.

प्रति,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

विषय :- शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण.
शाळा व्यवस्थापन प्रतिनिधींकरिता क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया, नॅबेट मान्यताप्राप्त प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन.
संदर्भ : समक्रमांकित दि. २७ मे २००९ चा शासन निर्णय.

क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेट (नॅशनल ॲक्रेडीटेशन बोर्ड फॅार एज्युकेशन ॲण्ड ट्रेनिंग) यांच्यावतीने गुणवत्तापूर्ण शालेय अधिशासनासाठी अधिमान्यता मानांकने (Acceditation Standards for quality School Govemance ) निर्धारित करण्यात आलेले आहे. मूल्यांकन व प्रमाणिकरणाच्या माध्यमातून शाळांना, शाळांशी संबंधित सर्व जबाबदाऱ्या व कर्तव्ये पार पाडण्याच्यादृष्टीने सक्षम करण्याकरिता सहकार्य केले जाते. मूल्यांकन व प्रमाणिकरणाचे लक्ष्य विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडविणे व पर्यायाने शाळांचा विकास व निरंतर गुणवत्ता विकास हे आहे. राज्य स्तरावर या संदर्भात शासन निर्णय, दि. २७ मे २००९ अन्वये राज्य सल्लागार समिती गठित करण्यात आलेली आहे. राज्यातील शाळांच्या व्यवस्थापनांना मूल्यांकन व प्रमाणिकरणाची संकल्पना माहित व्हावी या हेतूने राज्यातील विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अधिकार क्षेत्राअंतर्गत व्यवस्थापनांच्या प्रतिनिधींकरिता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी दिलेले आहेत. त्यानुसार क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेट मान्यताप्राप्त एज्युकेअर या संस्थेच्यावतीने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र | विभाग | प्रशिक्षणाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | पुणे | १८, १९ व २० जून २००९ |
| २ | औरंगाबाद | २१, २२ व २३ जून २००९ |
| ३ | लातूर | २८,२९ व ३० जून २००९ |
| ४ | अमरावती | २, ३ व ४ जुलै २००९ |
| ५ | नागपूर | ५, ६ व ७ जुलै २००९ |
| ६ | नाशिक | ९,१० व ११ जुलै २००९ |
| ७ | मुंबई | १२, १३ व १४ जुलै २००९ |
| ८ | कोल्हापूर | १६, १७ व १८ जुलै २००९ |

२. विभागनिहाय आयोजित करावयाच्या सदर प्रशिक्षण कार्यक्रमास २४ प्रशिक्षणार्थीच उपस्थित राहू शकत असल्याने विभागातील प्रत्येक जिल्हयामध्ये शाळा व्यवस्थापनांना/ प्रतिनिधींना समान प्रतिनिधीत्व मिळेल याची काळजी घ्यावी.

३. क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेटतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमाचे शुल्क रु. ५०००/- प्रतिव्यक्ती असून सदर शुल्क संबंधित व्यवस्थापन /प्रतिनिधींनी रोखीने अथवा धनादेशाने (एच.आर.कन्सल्टन्ट प्रा.लि.) देण्यात यावे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन ज्या शाळेमध्ये करण्यात येईल तेथे प्रशिक्षणाच्यादृष्टीने आवश्यक असणाऱ्या कॉन्फरन्स हॉल, एलसीडी प्रोजेक्टर, ॲम्प्लीफायर, कॉलर माईक, स्पीकर आदी आवश्यक सुविधा असाव्यात. तसेच ज्या ठिकाणी प्रशिक्षण आयोजित केले जाईल त्या शाळेने प्रशिक्षणार्थींकरिता व फॅकल्टीकरिता नाश्ता व जेवणाची व्यवस्था करावी.

४. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्यांना क्वॉलीटी कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेटचे प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम संपल्यानंतर देण्यात येईल. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीरित्या होईल याकरिता आपण व्यक्तिश: दक्ष रहावे.

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे.

शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे

श्री. विलास कुलकर्णी , कार्यकारी संचालक, एज्युकेअर.